महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक- ०२२-२२०२९२८२ ई-मेल- navnath.pokale@nic.in

**स्मरणपत्र**

क्रमांक : बीजीएम-१०.२४/प्र.क्र.१५२/अर्थ-१/२०२४. दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२४.

प्रति,

१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
२) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
३) कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.
४) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
५) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
६) मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई.

**विषय : कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२५-२६ तयार करणेबाबत.**
**संदर्भ :** १) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. काअंप-२०२४/प्र.क्र.२६/अर्थसंकल्प-१, दि.१४.१०.२०२४.
२) या कार्यासनाचे पत्र क्र.बीजीएम-१०.२४/प्र.क्र.१५२ /अर्थ-१, दि.१५.१०.२०२४.

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र.१ अन्वये कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०२५-२६ तयार करण्याच्या सूचना निर्गमित झाल्या आहेत. जलसंपदा विभाग (पाटबंधारे प्रकल्प) या कार्यक्रम अंदाजपत्रकाचे प्रारूप निश्चित करून **विहित कार्यक्रमानुसार मुद्रण करणे आवश्यक आहे**. सदर कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये आपल्या कार्यासनाशी संबंधीत असलेली माहिती समाविष्ट करावयाची आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ अन्वये दि.१५.१०.२०२४ पर्यंत अर्थ-१ कार्यासनास माहिती उपलब्ध करून देण्यासंदर्भात कळविले होते. अद्यापही आपल्या नियंत्रणाखालील कार्यासनाकडून माहिती अप्राप्त आहे.

२. यासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, वित्त विभागाच्या दि.१४.१०.२०२४ रोजीच्या परिपत्रकातील **मुद्दा क्र.१० कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. कार्यक्रम अंदाजपत्रकाशी संबंधित माहिती दि.१८.११.२०२४ पर्यंत उपलब्ध न केल्यास आपल्या कार्यासनाची गतवर्षीचीच माहिती सन २०२५-२६ च्या मुद्रणाकरिता पाठविण्यात येईल**. त्यानुषंगाने विधीमंडळात मुद्दे उपस्थित झाल्यास त्यास उत्तर देण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत अधिकारी यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

**(सतीश जोंधळे)**
**आंतरवित्तीय सल्लागार व सहसचिव**

प्रत:-

१) अर्थ-१/कार्यासन संग्रहार्थ.

E:\BUDGET २०२४-२५\SPS २०२४-२५\PERFORMANCE BUDGET २०२५-२६\CR- १५२-२०२४- कार्यक्रम अंदाजपत्रक २५-२६.DOC